## विकल्प संगम पत्रक

### भारत भरातील पर्यायांचे एकत्रिकरण

वाढती सामाजिक-आर्थिक दरी आणि मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा विनाश, समुहांचे विस्थापन, उपजीविकांचा-जीवनआधारांचा–हास हे सध्याच्या विकासाचे व जागतिकिकरणाचे सर्वांत विपरीत परीणाम आहेत. आर्थिक वाढीच्या अविचारी फुगवट्यामुळे, विविध भागांत आधीच तणाव व दंगे आहेत आणि अनेक भाग त्याच किना-यावर तग धरुन जगत आहेत. दरम्यान अर्थव्यवस्था आणि समाज यांच्या सर्व औपचारीक क्षेत्रांचाही याच दिशेने धावण्याकडे कल वळविला जातो आहे, मग ते क्षेत्र शिक्षण, संशोधऩ व विकास, बाजार आणि व्यापार असो किंवा आरोग्य असो. या निराशाजनक परिस्थीतीतही, अनेक पर्याय उभारले जात आहेत आणि त्यांचा अवलंबही केला जातो आहे. हे पर्याय सध्याच्या प्रचलित विकासाच्या प्रारुपाला आव्हान देतात. तसेंच ते पर्यावरणीय दृष्टीने आणि सामाजिक-आर्थिक दृष्टीनेही मानवी जीवन समृध्द करण्याचे योग्य मार्ग उपलव्ध करुन देत आहेत.

चिरायु शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय, जंगल आधारीत उपजीविका, लोकशाहीवादी बाजार आणि कामगारांच्या नियंत्रणात उत्पादन, समाजाच्या दृष्टिकोणातून शिक्षण व आरोग्य, विविध सांस्कृतीक समुहातील शाती-सलोख्याकरिता प्रयत्न, तसेंच वर्ग, जात, धर्म, वंश आणि लैंगिकतेवर आधारीत समता, शहरी संतुलित(-चिरायु) विकास, सर्वांगिण ग्रामीण स्वास्थ्य आणि अश्या अनेक गोष्टींचा यात समावेश आहे.

केवळ प्रतीनीधींवर अवलंबून न रहाता निर्णय प्रक्रियेत सर्वांचा सहभाग देणा-या सहभागी (क्रांतीकारी) लोकशाही आणि राजकीय पध्दतींत या विचारांमुळे जबाबदेही आणि पारदर्शकता सारखी आवश्यक प्रशासकीय तत्व, यासाठी रेटा वाढून ती अवलंबली जातात. स्थानिक व प्राकृतिक(लँडस्केप) स्तरावर खरोखरच पर्याय आहेत असे या प्रयत्नांमधून दिसून येते. मात्र विविध कारणांमुळे त्यांच्या परीणामकारक ठरण्याला मर्यादा येतात.

1.ब-यांच पर्यायांबाबत फारसे दस्तावेज नाहीत आणि लोकजागृती नाही.

2. ते बहुतेक फार लहान व विखुरलेले आहेत आणि त्यात परस्पर देवाणघेवाण नाही.

3. सामायिक चौकट किंवा पर्यायी समाजव्यवस्थेचा दृष्टीकोण अशी त्यांची एकत्रित बांधणी झालेली नाही.

त्यामुळे हे पर्याय ‘प्रचलित व्यवस्था बदलू शकेल’, अशी ताकद किंवा किमान त्यांना उग्र आव्हान बनू शकलेले नाहीत.

सोयीकरिता इथे विकल्प-पर्याय असा शब्द वापरला आहे. मात्र या संकल्पनेची गुंतागुत अचूकपणे आणि पूर्णपणे मांडणारा एक शब्द सापडणे अवघड आहे हे आम्ही मान्य करतो.

यातील अनेकांची सुरवात काही प्रचलित व्यवस्थेला आव्हान करण्याच्या हेतूने किंवा पर्याय उभारण्याच्या उद्देशाने झालेली नसेल. कदाचित् ह्या केवळ काही मूलभूत तत्त्वांवर आधारीत जीवनपध्दती-जगण्याच्या रीती असतील. तसेंच यातील अनेक कल्पना, संकल्पना आणि जीवनपध्दती ह्या दीर्घ काळापासून अस्तितवात असतील तर काही नवीनही असतील हे देखिल आम्ही समजू शकतो.

**विकल्प संगम किंवा पर्यायांचे एकत्रिकरण करण्याची कल्पना**

या पाश्वभूमीवर पर्यायांचा अवलंब करणा-यांच्या प्रादेशीक मेळाव्यांची सुरवात करण्यात आली, पुढील टप्प्यावर विशिष्ट विषयांनुसार आणि राष्ट्रीय मेळाव्याचा विचार आहे. यांना विकल्प संगम किंवा पर्यायांचे एकत्रिकरण असे म्हटले जाते. यामुळे परस्परांपासून शिकणे व सकारात्मक टीका करणे याकरिता एक मंच मिळेल, अशी अपेक्षा आहे. आपण यातून समन्वय साधू आणि एकत्रितपणे पर्यायी भविष्य विकसित करुं.

अनेक चळवळींना आणि गटांना याप्रकारे विविध मंचांवर एकत्रित आणण्याचे विविध प्रयत्न यापूर्वीही झालेले आहेत याची आम्हाला कल्पना आहे. मात्र यापैकि बहुतेक एकएक विषय किंवा त्या प्रकारच्या चळवळी असे मर्यादीत आहेत. उदा. विनाशकारी विकासप्रकल्प विरोधी चळवळी, आरोग्याच्या संदर्भातील पर्यायी प्रयत्न, चिरायु शेतीवर काम करणारे गट, इत्यादी. मात्र या विषयांच्या पार जाण्याच्या फारच कमी संधी किंवा प्रयत्न दिसतात ज्यात पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, न्याय, उपजीविका, बाजार व व्यापार, प्रशासन आणि अन्य पर्यायांपासून परस्परांनी शिकावे. हे संगम असे विविध विषयांची सागड घालणारे आणि सध्या सुरु असलेल्या प्रयत्नांची पुनर्रावृत्ती न करता पुढे जाणारे असावेत असे आम्ही याकडे बघतो.

विकल्प संगम मध्ये सध्याच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक व्यवस्थेतील वाईट काय यावर कमीत कमी वेळ दिला जावा, अन्यत्र याकरिता अनेक संधी उपलब्ध आहेत. आपले मेळावे हे प्रामुख्याने पर्यायांवर लक्ष केंद्रीत करतील. मात्र आपल्याला पर्यायांना अद्भूत करण्याच्या मोहात पडायचे नाही तर अश्या पर्यायांच्या लाभ व मर्यादा दोन्हींवर चर्चा व्हावी.

**विकल्प संगंमची रचना .........**

विकल्प संगम म्हणजे औपचारीक शैक्षणिक परीषदा भरवणे नव्हे. मोकळेपणाच्या वातावरणात मनांची व हृदयांची सहज प्रवाही भेटगाठ असावी हा उद्देश आहे. यात लहानलहान गटांत विशिष्ठ विषयातील ठराविक मुद्दे

घेऊन सखोल चर्चेतून शिकता येते. निम्मा वेळ विविध विषय व चळवळींना परस्परांकडून शिकण्याकरता वापरला जातो.

पोस्टर-फोटो प्रदर्शने, फिल्म व दृक् श्राव्य माध्यमे, नाटक आणि अन्य कला व माध्यमांचा वापर करुन आपल्या प्रयत्नांची देवाणखेवाण केलि जाते. उत्स्फूर्त कला व नाटकांचाही वापर करण्याचा प्रयत्न होतो. गंमत, शिकणे व आधी शिकलेले बदलणे आणि नाती निर्माण करणे हे सगळं म्हणजे संगम.

**सहभाग व स्थान...**

ढोबळपणे विनाशकारी आणि विषमतावादी विकासाला पर्याय शोधण्याकरिता काम करणारे सर्व इथे एकत्र येतात, प्रत्यक्ष काम करणारे, विचारवंत, संशोधक आणि सिध्दांत मांडणारे ( हे नेहमी एकमेकांना दूर सारणारेच गट असावेत असं काही आवश्यक नाही). स्थानिक परिस्थातीनुसार सहभाग घेणा-यांची संख्या काही डझन पासून काहीशे (शंभर-दीडशे) लोक याप्रमाणात असते.

प्रत्येक प्रदेशिक संगमाच्या आयोजनाकरिता, एका स्थानिक संघटनेने-संस्थेने क्षमतेनुसार जबाबदारी घेणे आवश्यक असते. आर्थिक भार ही आयोजक संस्था व अन्य सहआयोजक संस्था व सहभाग घेणारे मिळून उचलतात. अश्या कार्यक्रमांकरिता कोणा एकाने संपूर्ण नीधी उभा करणे शक्य नाही, त्यामुळे अनेकांना खर्चाचा वाटा उचलावा लागतो.

एक मध्यवर्ती गट संगमाच्या आयोजनाचा समन्वय करण्याकरिता विकसित झालेला आहे.या गटाचे सदस्य (नोव्हेंबर 2014ला) पुढील प्रमाणे....कल्पवृक्ष, डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटी (डी.डी.एस्), भूमी कॉलेज, शिक्षांतर, टिंबकटू कलेक्टीव्ह, डेव्हलपमेंट अलटरनेटीव्ह, सोपेकाम, जीन कॅम्पेन, भाषा, कृती टीम, सेंटर फॉर इकविटी स्टडीज (सी.इ.एस्), ऊरमूल, नॅशनल अलायन्स आंफ पीपल्स मूव्हमेंटस् (एन्.ए.पी.एम्), पीपल्स सायन्स इन्स्टीट्यूट (पी.एस्.आय्), माटी, अलायन्स फॉर ससटेनेबल अँड होलिस्टीक अँग्रिकल्चर (आशा), एकता परिषद, साऊथ एसियन डायलॉग आंन इकॉलॉजिकल डेमॉक्रसि (एस्.ए.डी .ई.डी.), नॉलेज इन् सिव्हिल सोसायटी (के.आय् सी एस्), नॉर्थ ईस्ट स्लो फूड अन्ड अँग्रोबायोडायव्हर्सिटि सोसायटी (एन् ई एस् एफ् ए एस्), अँकोर्ड, सेंटर फॉर एड्यूकेशन अँड डॉक्यूमेंटेशन, रीस्टोअर. कोम्युनीटी, द युथ कलेक्टीव्ह, सुषमा अय्यंगार आणि दिनेश अब् राय (इतर लवकरच जोडून घेतील अशी अपेक्षा).

**रुची असेल तर...** कृपया संपर्क करा....आशिष कोठारी, chikikothari@gmail.com सुजाता पद्मनाभन sujikahalwa@gmail.com; ,राशी मिश्रा rashi.mish@gmail.com

1.वसाहती व वाहतुक व्यवस्था., 2.समाज व संस्कृती, 3.ऊर्जा, 4.शिकणे व शिक्षण, 5.ज्ञान आणि प्रसारमाध्यमं.
6.पर्यायी अर्थव्यवस्था, 7.अन्न व पाणी, 8.उपजीविका, 9.पर्यायी राजकारण 10.पर्यावरण व परिसंस्था शास्त्र.
11.आरोग्य व स्वच्छता.

